**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.गवाणकर यांच्या मार्फत**

०८. मी प्रतिवादींनी दिलेली लेखी कैफियत वाचलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुळ पुरुष तुकाराम विठ्ठल जोशी हे सन १९५६ च्या पुर्वी मयत झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विठ्ठल जोशी हे सन १९७५ मध्ये मयत झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत दाव्यामध्ये स.नं. ५६ हि.क्र. २/४/१ समाविष्ठ केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, स.नं. ५६ हि.क्र. २/४/१ ही वडीलार्जीत मिळकत आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो सदर मिळकत खरेदीखताने माझ्या आईने खरेदी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, स.नं. ५६. हिक्र. २/४/१ ही मिळकत मुळ पुरुष तुकाराम विठ्ठल जोशी यांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की तुकाराम विठ्ठल जोशी यांनी माझ्या आईला खरेदीखत करुन दिले नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांचा मुलगा श्रीधर जोशी खरेदीखत करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, श्रीधर जोशी हा तुकाराम विठ्ठल जोशी यांचा मुलगा नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्रीधर जोशी यांनी माझ्या आईच्या हक्कात केलेल्या खरेदीखताला दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ओरस यांच्या न्यायालयामध्ये दावा दाखल करुन आव्हानीत केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला वरील दाव्याची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये सदर दाव्यातील वादी यांनी असे कथन केलेले आहे की, विठ्ठल जोशी यांच्या वारसांनी नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्र श्रीधर जोशी यांना करुन दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, श्रीधर जोशी यांना करुन दिलेले कुलमुखत्यारपत्र नोंदणीकृत नाही. हे म्हणणे खरे आहे की, विठ्ठल जोशी यांच्या वारसांचे असे म्हणणे होते की, श्रीधर जोशी यांना नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्र करुन दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई लक्ष्मी हिने श्रीधर जोशी यांना पैसे दिले होते ही बाब दर्शविण्यासाठी माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर दाव्यामध्ये विठ्ठल जोशी यांच्या वारसांनी असे कथन केलेले आहे की, माझ्या आईच्या हक्कामध्ये केलेले खरेदीखत हे विनामोबदला करुन दिलेले होते.

०९. दावा मिळकतीचे क्षेत्र ३५.७० आर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये माझा व प्रतिवादी क्र. ६ व ७ यांचा १/७२ हिस्सा असल्याचे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील हिस्सा स्वतंत्र करण्याची मागणी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही माड बागायत जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही १.४८ आर क्षेत्राची प्रस्तुत दाव्यामध्ये मागणी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, १० गुंठयापेक्षा कमी क्षेत्राचा माड बागायत जमिनीमध्ये हिस्सा मागता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यामध्ये आवश्यक ती मिळकत समाविष्ठ केली नसल्यामुळे त्यास बाधा येते.

प्रतिवादीच्या विधिज्ञांनी ओरस येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याची प्रत हजर करुन त्या संदर्भात साक्षीदारास काही प्रश्न विचारावयाचे आहेत. त्यामुळे उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्याची विनंती केली. त्यानुसार उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : २९/०८/२०२४

महेश रा. देवकते
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण